**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बृहन्मुंबई मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन
नियमावली-२०३४ ला शुध्दीपत्रक .

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**क्रमांक :- टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७(III)/नवि-११**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०२१,**
**दिनांक :- १२ नोव्हेंबर, २०१८.**

**शासन निर्णय** : सोबतचे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( संजय बाणाईत )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

(१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
(२) मा. राज्यमंत्री ( नगर विकास ) यांचे स्वीय सहाय्यक.

**प्रति,**

(१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
(२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(३) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्साहटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.
(४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी २५ प्रती १)नगर विकास विभाग नवि-११), मंत्रालय, मुंबई २) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई ३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व ४) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(५) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शुध्दीपत्रक विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे.
(६) निवड नस्ती (नवि-११)

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

---

**Corrigendum in respect of sanctioned Development Control Regulation-2034 of Greater Mumbai.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Date :- 12th November, 2018**

**CORRIGENDUM**

**No. TPB-4317/629/CR-118/2017(III)/UD-11**

Whereas, in exercise of the powers conferred by sub Section (1) of Section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the Said Act"), the State Government vide Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08/05/2018 (hereinafter referred to as "the said Notification") has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification. And whereas, Government has issued corrigendum of even number dt. 22nd June, 2018 and thereafter issued a Corrigendum and Addendum of even number dt. 29th June, 2018 to the said Notification, which is published in Government Gazette dt. 30th June, 2018;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification dt. 21/09/2018 has sanctioned EP -1 to EP-168 ( Excluding certain EP and provisions which were kept in abeyance ) in the Development Control and Promotion Regulations -2034, which were excluded as substantial modifications;

And whereas, it is noticed that there are some typographical errors and mistakes, in the Notification sanctioning the EP and also the commissioner,Mucipal Corporation of Greater Mumbai vide his letter dated 06/11/2018 has pointed out certain additional errors and mistakes and therefore to rectify such mistakes and also to clarify and co-relate certain provisions of sanctioned DCPR for its proper interpretation, Government feels it necessary to issue a Corrigendum for the same;

Now, therefore, this Corrigendum is issued in respect of such errors and mistakes in the said Notification and in sanctioned provisions of the Development Control and Promotion Regulations-2034 as mentioned in Sehedule appended hereto.

Copy of this Corrigendum is made available for the inspection of the public in the following offices during office hours on all working days for period of thirty days.

(1) Chief Engineer (Development Plan), Municipal Corporation of Greater Mumbai, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, 'E' Block, ENSA Hutment, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

This Corrigendum shall also be available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in **(Acts& Ruls)**

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

**( Pradeep Gohil )**
**Under Secretary to Government.**

**<u>महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६</u>**
बृहन्मुंबई मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन
नियमावली-२०३४ ला शुध्दीपत्रक .

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०२१,**
**दिनांक :- १२ नोव्हेंबर, २०१८**

**<u>शुध्दीपत्रक</u>**

**क्रमांक :- टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७(III)/नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करणेत आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (1) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने अधिसूचना क्र.टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि.८/०५/२०१८ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अे मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस समकमांकाचे शुध्दीपत्रक दि.२२ जून २०१८ रोजी व त्यानंतर समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले आहे आणि ज्याअर्थी , सदरहु दि. २९/०६/२०१८ रोजीचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने दि. २१/०९/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रारुप विकास योजना-२०३४ ला भागश: मंजूरी देताना मंजूरीतून वगळलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली /२०३४ मधील सारभूत स्वरुपाचे फेरबदल ईपी-१ते ईपी-१६८ ला ( ठराविक ईपी व निर्णयार्थ प्रलंबित ठेवलेल्या ठराविक तरतुदी वगळून) मंजूरी प्रदान केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूरीच्या अधिसूचनेत आणि मंजूर तरतुदीमध्ये इतर काही टंकलेखनाच्या त्रुटी व चूका असल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच आयुक्त् बृहनमुंबई महानगर पालिका यांनी दि. ६/११/२१८ रोजीचे पत्रान्वये काही अतिरिक्त त्रृटी व चुका निदर्शनास आणलेल्या आहेत. त्यामुळे मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील काही तरतूदींच्या अर्थबोधाची स्पष्टता करुन सुसंगती आणणे आणि त्याकरीता शुध्दीपत्रक निर्गमित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि त्याअर्थी, उक्त अधिसूचनेत आणि मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील इतर मंजूर तरतुदीमध्ये अशा सुधारणा करण्यासाठी सोबतचे परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

उक्त शुध्दीपत्रकाची प्रत नागरिकांचे अवलोकनार्थ तीस दिवसांचे कालावधीपर्यंत खालील ठिकाणी कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध राहील :-

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, ML BAI-32 सत्यमेव जयते

१) प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४००००१.

२) उप संचालक, नगररचना, बृहन्मुंबई , इन्सा हटमेंट्स, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.

सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in (कायदे व नियम) या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( प्रदीप गोहिल )**
**अवर सचिव महाराष्ट्र शासन**